REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# प्रशासनातील राजकारणाच सर्जीकल स्ट्राईक

डॉ. तुषार निकाळजे

**प्रस्तावना :**



पुलवामा येथे भारताच्या चाळीस जवानांवर दहशतवाद्यांनी हल्ला केल्याने ४० जवानांना मरण आले आणि ते मातृभूमिसाठी शहिद झाले. याला प्रत्युत्तर म्हणून भारताच्या वायुदलाने पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर एअर अ‍ॅटॅक केला. यात वायुदलाच्या काही वैमानिकांनी सर्व शक्ती पणाला लावून दहशतवाद्यांचा खात्मा केला. या प्रकाराला लढाई करण्याच्या कृतीमध्ये सर्जिकल स्ट्राईक म्हटले जाते. यापूर्वी काहीवेळा असे सर्जिकल स्ट्राईक झाले आहेत. २९ सप्टेंबर २०१६ मध्ये भारतीय जवानांनी पाकिस्तान अधिकृत काश्मीरच्या काही आतंकवाछी ठिकाणांवर सर्जिकल स्ट्राईक केला होता. वर्ष २००३ मध्ये इराक युध्दाची सुरूवात बगदाद शहरावर झालेल्या बॉम्बच्या वर्षावाने झाली होती. यालादेखील सर्जिकल स्ट्राईक म्हटले गेले. एल.ओ.सी. ऑपरेशन हा सर्जिकल स्ट्राईकचा एक प्रकार होता. हे सर्व युध्दनिती, रणनितीमध्ये वापरले जाणारे तंत्र आहे. मागील आठवड्यात यावर रोजच चर्चा, बातम्या, मोर्चे, निदर्शने पहावयास मिळाली. या बातम्या, चर्चा वर्तमानपत्रांमध्ये वाचताना इतर घटनांचा उल्लेख होता. त्यामध्ये एक बातमी वाचनात आली, ''प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी एका परीक्षा संचालकांना हटविण्याच्या हालचालींना वेग आला आहे.'' प्रशासन व्यवस्थेतील तशी ही क्षुल्लक बाब आहे. परंतु बारकाईने अभ्यास केल्यास, त्यामागील काही प्रशासकिय, राजकिय परिस्थितीचे अवलोकन केल्यास हा प्रशासकीय व्यवस्थेतील सर्जिकल स्ट्राईक वाटतो. शैक्षणिक व्यवस्थेतील मागील १० ते १५ वर्षांमध्ये घडलेल्या घटनांचा मागोवा घेतल्यास राजकारण्यांच्या सत्ताधारी-विरोधक राजनितीचा हा सर्जिकल स्ट्राईक म्हणावा. या लेखात प्रशासनातील राजकारणाच्या सर्जिकल स्ट्राईकचे बळी कसे घेतले जातात? याची चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) सर्जिकल स्ट्राईक म्हणजे काय? :** वास्तविक सर्जिकल स्ट्राईक ही व्याख्या युध्दनितीमध्ये वापरली जाते. सैन्यामार्फत दुष्मनांवर केलेला हल्ला असतो. यामध्ये एक रणनिती तयार केली जाते. याकरीता वेळ, काळ, स्थळ, कमांडोजची संख्या, शस्त्रांचे प्रकार याची गोपनीय माहिती तयार केली जाते. काही मोजक्याच व्यक्तींना याची माहिती दिली जाते. परंतु याकरीता ज्याठिकाणी हल्ला केला जातो, त्या ठिकाणच्या सार्वजनिक मालमत्तेला, सर्वसामान्य जनतेला, मुलभूत संरचना यांना कोणतीही हाती किंवा इजा पोहोचविली जात नाही. याची काटेकोरपणे दक्षता घेतली जाते. हे एकप्रकारे शक्तीप्रदर्शनच समजले जाते. ही कृती करण्यापूर्वी कोणतीतरी कृती घडलेली असते किंवा काही असंतुष्टता विरोधकांमध्ये असते. असाच प्रकार व्यवस्थांमध्ये घडत असतो. एखादे पद काबीज करण्यासाठी किंवा आपल्या रस्त्यातील अडसर दूर करण्यासाठी किंवा शक्तीप्रदर्शकन करण्यासाठी किंवा सत्तेवर असलेल्यांना खाली खेचण्यासाठी विरोधक अशा प्रकारच्या प्रशासकिय व राजकीय खेळ्यांचा वापर करताना दिसतात.

**२) सत्ताधारी-विरोधक-अपक्ष कोण? :** व्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष राजकारणाला मान्यताप्राप्त स्थान नाही. नागरी सेवा नियमांमध्ये कोणत्याही सेवक किंवा अधिकाऱ्यास राजकीय पक्षाचा सभासद किंवा राजकारणात भाग घेण्यास मनाई आहे. परंतु हे अधिकारी-कर्मचारी कोणत्यातरी राजकीय पक्षाच्या, नेत्यांच्या प्रभावाखाली काम करीत असतात. वेगवेगळ्या पक्षांचे, नेत्यांचे वेगवेगळे गट कार्यरत असतात. हे गट विरोधक-सत्ताधारी-अपक्ष म्हणून ओळखले जातात. पूर्वी राजे-महाराजे व त्यांची जनता जशी मांडलिकत्व पत्करून राहात असे. अगदी तसा प्रकार पाहावयास मिळतो. कधीकधी स्वतःचे वर्चस्व दाखविण्यासाठी विरोधकांच्या किंवा अपक्षासारखे काम करणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याचा बळी किंवा टार्गेट केले जाते. तसा प्रकार बहुधा पेपर फुटीतील परीक्षा संचालकांचा झाला असावा. अधिकाऱ्यांच्या सर्जिकल स्ट्राईकला नुसता एखादा अधिकारी वेठीस धरला जात नाही. तर एखाद्या प्रामाणिक कर्मचाऱ्यावर अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्जिकल स्ट्राईकची उदाहरणे आहेत. कोणाही अधिकाऱ्याचे मांडलिकत्व न जुमानणाऱ्या, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, शैक्षणिक-आर्थिक प्रगती करू इच्छिणारा कर्मचारी टार्गेट ठरतो. कारण हा कर्मचारी प्रगत होवून भविष्यात यांच्या कारनाम्यांना अडचण ठरतो की काय? अशी भिती असावी. वेगवेगळे अधिकारी, वेगवेगळ्या नियमांचा वापर (शस्त्रहल्ला) करून अशा कर्मचाऱ्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. प्रशासनातील शस्त्रहल्ला-आर्थिक फायदे न देणे, अडचणीच्या ठिकाणी बदली, कारणे दाखवा नोटीस. आर्थिक प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणे, ज्यादा काम असलेल्या ठिकाणचे टेबल देणे इत्यादी.

**३) कामगार-कर्मचारी संघटनांची भूमिका :-** वास्तविक कामगार संघटना हा प्रशासन व कर्मचारी यांच्यातील दुवा मानला जातो. फक्त संघटनेचा सभासद असलेल्या कर्मचाऱ्याचीच कामे होताना दिसतात. बदल्यांच्या काळातील कामगार संघटनांचा प्रशासनावरचा सर्जिकल स्ट्राईक आपणांस माहित आहे. संघटनादेखील कोणत्यातरी राजकीय पक्षाशी अप्रत्यक्षरित्या निगडीत असते. काही संघटना एखाद्य राजकीय पक्षाच्या पुरस्कर्त्या परंतु विरोधी पक्षांच्या अधिकाऱ्यांशी सलोख्याचे संबंध ठेवणाऱ्या. स्वार्थासाठी दुटप्पी धोरण स्विकारणाऱ्या कि स्वार्थी/संधीसाधू, सरड्यांप्रमाणे रंग बदलणारे.

**४) २००८ ते २०१८ मध्ये घडलेल्या काही गंभीर घटना :-** २००८ मध्ये एका कुलगुरूंची निवड झाली. परंतु ते फक्त एक ते दिड वर्षच राहिले. नंतर ते दुसऱ्या एका वरिष्ठ पदावर व नंतर मंत्री झाले. आता त्यांना राजकारणी म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नंतरचे कुलगुरूदेखील एक वर्षभर पदावर राहून दुसरीकडे वरिष्ठ स्तरावर रूजू झाले. त्यांनी स्वतः एक वक्तव्य केले ''कुलगुरू पदाचा वापर स्टेपींग स्टोन म्हणून केला जातो.'' दहा वर्षात चार पूर्णवेळ व दोन पदभार दिलेले कुलगुरू या शिक्षण व्यवस्थेला मिळाल्यास त्या व्यवस्थेची काय अवस्था असेल? २००८ ते २०१८ या दशकात काही प्रशासकीय (कि राजकीय) घडामोडी झाल्या. २००८ मध्ये कुलगुरूंच्या स्वीय सहाय्यकाचा बोगस महाविद्यालय प्रकरणात सहभाग, विद्यार्थ्यांचे अवैध गुणवाढ प्रकरणात एका अधिकारी व सेवकाचा समावेश, लेजरची पाने बदलून परदेशी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण, नोकर भरती घोटाळा, खुद्द अधिकाऱ्यांच्या बोगस पदव्या, अवैध पात्रतेअभावी नियुक्ती, इत्यादी बऱ्याच प्रकरणांवर नुसत्याच चौकशा झाल्या. परंतु कारवाई शून्य. काहींना निलंबित करून पुन्हा रूजू केले गेले, बऱ्याच जणांचे चौकशी अहवाल गुलदस्त्यात राहिले की ठेवले? कल्पना नाही. यातील बरेच जण सहीसलामत सेवानिवृत्त झाले, त्यांना बढत्या-पदोन्नत्या, वेतनवाढीदेखील दिल्या गेल्या. वरील प्रकरणांवर काहीवेळा निवृत्त न्यायाधिश, सीबीआय अधिकारी, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या चौकश्या झाल्या, परंतु त्यांनी दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी झालीच नाही. यापूर्वीच्या परीक्षा नियंत्रकांनी परीक्षा विभागातील पंधरा जणांच्या बदल्या केल्या. का केल्या? याचा शोध घेतल्यास वेगळीच कारणे पुढे येतील. या अधिकाऱ्यास अडचणीत आणण्यासाठी काही सेवक, संघटना व अधिकाऱ्यांनी व्यूहरचना केली आणि त्या अधिकाऱ्या निलंबित केले गेले. असे एक ना अनेक प्रकार घडले. परंतु आजच्या परीक्षा संचालकांसारखे हटविण्याचे प्रकार घडले नाहीत.

**५) विश्वस्तांचे बदलते स्वरूप :-** पानिपतचे विश्वासराव. पण व्यवस्थेतील काही विश्वस्त वगेळे. काही राजकीय व आर्थिक सत्तेसाठी मोठमोठ्या लढाया लढणारे. परंतु धुर्त आणि घातकी. इतरांचा कसा बळी द्यायचा याचे इतंभूत ज्ञान असणारे. अपणांस पाहिजे असलेली सत्ता (खुर्ची किंवा पद) मिळविण्यासाठी प्रसंगी दुष्मनांशी दोस्ती करणारे आणि नंतर त्यांचाच केसाने गळा

कापणारे. यांची प्यादीदेखील वेगवेगळ्या विभागांत कार्यरत. या सरदारावर बाका प्रसंग आल्यास तुटून पडणारे. कदाचित सध्या चौकशीच्या वादात सापडलेले परीक्षा नियंत्रकपद नंतर स्वतःकडे येण्याचा या युगातील विश्वासरावांचा प्रयत्न असावा.

**६) चौकशी समितीच्या मर्यादा :-** प्रशासकीय व्यवस्थेतील चौकशी समितीस काही मर्यादा आहेत. इतर यंत्रणांना जे अधिकार आहेत, त्या प्रकारचे अधिकर नाहीत. उदा. सक्तवसुली संचनालय, सी.आय.डी., सी.बी.आय., पोलीस, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग इत्यादी, घडलेल्या प्रकरणाची चौकशी करताना मोबाईल इन-आऊट रेकॉर्ड, चौकशी दरम्यान संघटनेच्या अधिकाऱ्यांची भेटी, संबंधित सेवक व अधिकाऱ्याच्या दैनंदिन हालचाली, व्यक्तीचा संपर्क या कालावधीतील बदल्या, अर्जित-वैद्यकिय-किरकोळ रजा इत्यादींची इतंभूत माहिती मिळाल्यास जी प्रकरणे घडतात त्याचा कुठेतर राजकीय किंवा आर्थिक संबंध निश्चित सापडेल.

वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार केल्यास व्यवस्थेतील एखाद्या अधिकाऱ्यास किंवा सेवकास हटविण्यासाठी केलेली कृती ही सर्जिकल स्ट्राईकचा एक राजकीय प्रकार असेल, असे वाटते.

**संदर्भ :-**


१) परीक्षा संचालकांना हटविण्याच्या हालचाली सुरू, दै.लोकमत हॅलो पुणे, दि. १ मार्च २०१९.
२) प्रश्नपत्रिका फुटीच्या चौकशीसाठी पुन्हा समिती : दै. लोकमत हॅलो पुणे, दि. २ मार्च २०१९.
३) परीक्षा नियंत्रक निलंबित : दै. सकाळ दि. १२ एप्रिल २०१४, पृष्ठ ५.
४) फोटोग्राफर असतानाही ठेकेदारांवर लाखोंची उधळपट्टी : दै.लोकमत, दि.१० फेब्रुवारी, २०१९.
५) उच्च शिक्षणही होणार ऑनलाईन : दै.सकाळ. दि.१० फेब्रु.२०१९ टुडे पृष्ठ ३.
६) नाव बदलले, पण कारभार बदलणार का? दै.लोकसत्ता दि.८ नोव्हें.२०१७ पृष्ठ ५.
७) फेरबदलात मनुष्यबळ विकास मंत्र्याना वस्त्रोद्योग खाते : दै.लोकमत दि. ६ जुलै २०१६ पृष्ठ ९.
८) विद्यापीठाने घेतले दोषी कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत : दै. पुढारी दि.१४ मे २०१७.
९) कॅगकडे गैरव्यवहारांच्या तक्रारी : दै.लोकमत हॅलो पुणे दि.१४ सप्टें.२०१७.
१०) महाविद्यालयात उडणार निवडणुकीचा गुलाल : दै.लोकमत दि.२२ जून २०१८.
११) कुलसचिव घेतात स्वतंत्र मानधन : दै.लोकमत दि. २० फेब्रु. २०१८.
१२) आजी-माजी कुलसचिवांकडून वसुली : दै.लोकमत दि.२१ फेब्रु. २०१८.
१३) विद्यापीठ अधिसभेच्या निवडणुकीवर आक्षेप, उच्च न्यायालयात याचिका : दै. लोकमत दि.२४ नोव्हें. २०१७ पृष्ठ १२.
१४) अधिसभेत होऊ शकतो राजकीय हस्तक्षेप : दै. लोकमत दि. ३० नोव्हें. २०१७ पृष्ठ ८.
१५) विद्यापीठाच्या प्रशासनाची खेळी संशयाच्या भोवऱ्यात : दै. लोकमत दि. २६ डिसेंबर २०१७.
१६) विद्यापीठाशी नाळ असलेला कुलगुरू हवा : दै. सकाळ दि. ९ मे २०१७ पृष्ठ७.
१७) कुलगुरू हा प्रशासकिय अधिकारी असावा : दै.सकाळ दि. १३ सप्टेंबर २०१७ पृष्ठ ४.
१८) विद्यापीठ निवडणुकांचा गोंधळ : दै.लोकमत हॅलो पुणे दि.१५ सप्टेंबर २०१७ पृष्ठ ६.
१९) विद्यापीठच्या आनागोंदी कारभाराची होणार चौकशी : दै. पुढारी दि. १८ मार्च २०१७.
२०) विद्यार्थ्यांसाठी वेळ राखीव ठेवावा : दै. लोकमत दि. २६ जुलै २०१८.
२१) गोपनीय लूट : दै.सकाळ दि. २६ मार्च २०१७.
२२) विद्यापीठांचा करभार ५० टक्के मनुष्यबळावर : दै. लोकमत दि. ५ सप्टेंबर २०१८
२३) डुप्लीकेट गुणपत्रिका पडली महागात : दै. सकाळ दि.१८ जानेवारी २०१२ पृष्ठ४
२४) विद्यापीठात नोकरीच्या बनावट नियुक्तीपत्राने फसवणूक : दै.लोकमत दि.२० ऑगस्ट २०१४ पृष्ठ ४.
२५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र दि. १ मार्च २०१६ डी.ओ.एफ.क्र.१-७/२०११ (एस.सी.टी.)
२६) मा. कुलपती, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दि. १२ जानेवारी २०१० संदर्भ क्र. CS/Pu/37/091(6910)/107.

२७) नियोजन विभाग आवक क्र.२४९९ दि. ११/०८/२००९.
२८) प्रकरण क्र.०५/२०१५ (पी) विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण पुणे.
२९) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र दि. ३/२/२०१० व दि. २९/१०/२०१०.
३०) विद्यापीठास दिलेले पत्र दि. ३१/१/२०१८ व दि. १७/१/२०१९.
३१) विद्यापीठाचे पत्र संदर्भ एएन/२४८९ दि. ८ जून २०१८.
३२) मा.सह-संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना दिलेले पत्र दि.५/६/२०१८.
३३) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर अर्जक्र.७५४३ दि.११/८/२०१६.



डॉ. तुषार निकाळजे

LBP PUBLICATION